# - प्रेस नोट -

दि. ११/०९/२०२६

## शिवाजीनगर पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.०९/०९/२०२६ रोजी १७.३० वा.च्या सुमारास फिर्यादी कासीमउद्दीन लियाज अन्सारी, वय-४० वर्षे, धंदा- शिलाईकाम, रा.ठी- भारत मस्जिद जवळ, बैंगनवाडी, गोवंडी, मुंबई यांनी दिलेल्या तक्रारीनुसार फिर्यादी यांचा मुलगा व त्याचा मित्र हे शाळेतून खाजगी टयुशन वरून घरी येत असताना विधीसंघर्षग्रस्त बालक याने बी.एम.सी.स्कुल ३ समोर, रोड नं १३, शिवाजीनगर, गोवंडी मुंबई येथे येऊन सकाळी शाळेत झालेल्या जुन्या वादाचा राग मनात धरून शिवीगाळ करून फिर्यादी यांच्या मुलाच्या पोटावर, छातीवर चाकुने वार करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.१०/०९/२०२६ रोजी गु.र.क्र. ७६९/२६, कलम १०९(१), ३५२, ३५१(२) बीएनएस २०२३ सह कलम ३७(१)(अ), १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

----------------------